# शोधांच्या विश्वात

"आज देश कोणताही असो, त्याची परंपरा कोणतीही असो, तो कोणत्याही विकासावस्थेत असो, त्याची प्रगती होण्यासाठी, जीवनात सुखसमाधान नांदण्यासाठी शोधमनस्कतेचे (रिसर्च मायंडेडनेसचे) संस्करण सार्वत्रिक व्हावयास हवे. म्हणूनच त्याची सुरवात शिक्षणापासून व्हावयास हवी. विशेषत: विद्याव्यासंग व ज्ञानक्षेत्रातील नवअध्यापकांवर तिचे दृढ संस्कार होणे अवश्य झालेले आहे. याचाच अर्थ शोधमनस्कता हा आजचा ज्ञानक्षेत्रातील परवलीचा शब्द झालेला आहे."

पृष्ठ क्र. २४-२५, ***शोधविज्ञान कोश***, डॉ.दु.का.संत
पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे - ३०,(१९८५)



*'आधी तथ्ये पारखून घ्या ' हा संशोधनाचा मूलमंत्र असला तरी तथ्ये पारखणे हे वाटते तितके सोपे नाही.* – **डॉ. भांडारकर**



**योगेश पंढरीनाथ सदगीर**
अपंगांच्या वरिष्ठगट ८ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद
स्पर्धा-बंगलोर
४००मी.धावणे-कास्यपदक, ८००मी.धावणे -रौप्यपदक




**कु.अर्चना बबनराव क्षीरसागर**
आंतरविद्यापीठ हँडबॉल महिला स्पर्धा, अन्नामलई
विद्यापीठ चिदमबरंम्, तामिळनाडू करिता
पुणे विद्यापीठाच्या संघात निवड




**कु.सुनिता बाळासाहेब नवले**
आंतरविद्यापीठ हँडबॉल महिला स्पर्धा, अन्नामलई
विद्यापीठ चिदमबरंम्, तामिळनाडू आ.वि.बास्केटबॉल
स्पर्धे साठी आ.जि.क्रि.वि.संघात निवड



**कु.स्वाती माधव तळेकर**
आंतरविभागीय हँडबॉल महिला स्पर्धा,
नाशिक व महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद हँडबॉल
स्पर्धे साठी अ.जि.क्रि.वि.संघात निवड



**रंगनाथ नामदेव मडके**
आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धा-घोडेगांव
आंतर वि.वै.मैदानी स्पर्धा-बालेवाडी साठी
महाराष्ट्र राज्य आजिंक्यपद क्रॉसकंट्री स्पर्धे
साठी अ.जि.क्रि.वि.संघात निवड



**विजय रंगनाथ भोईर**
राज्य मलखांब स्पर्धा-अंधेरी,मुंबई
सहभाग (२००५-०६)



**शंकर लक्ष्मण मोखरे**
महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद क्रासकंट्री स्पर्धेसाठी
अहमदनगर जिल्ह्याच्या संघात निवड
(पुणे)




**कु.रुमाना शेख**
आंतरविभागीय हँडबॉल महिला
स्पर्धे साठी अ.जि.क्रि.वि.संघात निवड



**कु.तेजश्री फापाळे**
आंतरविभागीय हँडबॉल महिला
स्पर्धे साठी अ.जि.क्रि.वि.संघात निवड



**कु.रोहिनी एकनाथ पापळ**
आंतरविभागीय हँडबॉल, बास्केटबॉल व
४०० मी.धावणे करीता अहमदनगर जिल्ह्याच्या
संघात निवड



**कु.राजश्री नरेंद्र खैरनार**
आंतरविभागीय हँडबॉल, बास्केटबॉल व
थाळी फेक साठी अ.जि.क्रि.वि.
संघात निवड




**मंगेश काशिनाथ थोरात**
पुणे विद्यापीठ पातळीवरील आतंरविभागीय
हँडबॉल स्पर्धा नाशिक साठी
अ.जि.क्रि.वि.संघात निवड



**धनंजय अर्जुन भोंगळे**
पुणे विद्यापीठ पातळीवरील आतंरविभागीय
हँडबॉल स्पर्धा नाशिक साठी
अ.जि.क्रि.वि.संघात निवड



प्रमुख पाहुण्यांचे हस्ते चॅम्पियन ऑफ चॅम्पियन ट्रॉफी स्वीकारताना कु.आरती विलास आरोटे



मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर करतांना
महाविद्यालयीन विद्यार्थी
सुशील घादवड व विजय भोईर



वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त मल्ल दोरावर प्रात्यक्षिक
करताना महाविद्यालयाची विद्यार्थिनी
कु.रूपाली संपत गायकवाड

# जिमखाना विभाग



जिल्हास्तरीय हॅन्डबॉल स्पर्धा, उद्‌घाटन
प्रमुख पाहुणे मा. विठ्ठलराव चासकर, मा. ॲड.के.बी.हांडे
जिल्हा क्रीडा अधिकारी मा.सौ.प्रमोदिनी गड्डमवार व प्राचार्य



जिल्हास्तरीय हॅन्डबॉल स्पर्धेतील मुलींचा सामना



पुणे विभागीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड झालेले व सोलापुर
येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू
अध्यक्ष, सेक्रेटरी व प्राचार्य यांच्या समवेत



२६ जानेवारी २००६ रोजी श्री.योगेश सदगीर याचा
अध्यक्ष मा. विठ्ठलराव चासकर यांच्या हस्ते सत्कार



श्री.योगेश सदगीर (वरिष्ठ गट): ८ व्या राष्ट्रीय स्पर्धेतील
८०० मी.धावणे मध्ये दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना.



श्री.रंगनाथ नामदेव मडके : आंतरमहाविद्यालयीन हाफ
मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना
(स्थळ: अहमदनगर)

# जिमखाना विभाग





३४ व्या सीनियर नॅशनल हॅण्डबॉल चॅम्पियनशिप तसेच ५१ व्या शालेय नॅशनल हॅण्डबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेतील सहभागी खेळाडू मा.प्राचार्य, उपप्राचार्य व पर्यवेक्षक यांचे समवेत



तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत सहभागी झालेला कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ



तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू



जिल्हास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत सहभागी झालेला महाविद्यालयाचा संघ, अध्यक्ष, विद्यार्थी मंडळ व सदस्य, जिमखाना समिती यांचे समवेत



राज्यस्तरीय हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स व मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व क्रीडा मार्गदर्शक श्री.नंदलाल काळन यांचे समवेत



तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे विजयी व सहभागी झालेला कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ



जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत (भिंगार,अ.नगर) सहभागी झालेला कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ, मा.प्राचार्य, उपप्राचार्य व पर्यवेक्षक यांचे समवेत.



जिल्हास्तरीय विभागीय व राज्यस्तरीय मल्लखांब शालेय स्पर्धेत निवड झालेला खेळाडू, मा.प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व क्रीडाशिक्षक श्री.काळन यांचे समवेत.



जिल्हास्तरीय हॅण्डबॉल स्पर्धेत विजयी झालेला व विभागीय स्पर्धेत सहभागी झालेला संघ, मा.प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व क्रीडाशिक्षक श्री.काळन यांचे समवेत.



जिल्हास्तरीय थ्रो-बॉल स्पर्धेत (पाथर्डी) विजयी झालेला व पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेला संघ, जिल्हा थ्रो-बॉल असो.चे पंच व क्रीडा मार्गदर्शक श्री.काळन यांचे समवेत



जिल्हास्तरीय हॅण्डबॉल स्पर्धेत सहभागी झालेला संघ, मा.प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व क्रीडाशिक्षक श्री.काळन यांचे समवेत.



ले.कर्नल सर्मा परेड निरीक्षण साठी जाताना,
सोबत U/O देशमुख




ले.कर्नल सर्मा CO 57 Bn N.C.C. अ.नगर यांचा सत्कार करताना
मा.विठ्ठलराव चासकर व मा.प्राचार्य,उपप्राचार्य समवेत
मे.शिंदे



राष्ट्रीय छात्र सेना शिबिरात वृक्षारोपण करताना
मेहराबाद येथे मेहरबाबा ट्रस्टचे विश्वस्त दस्तुर व N.C.C.अधिकारी मे.शिंदे व स्टाफ




मा.आ.मधुकरराव पिचड, का.विश्वस्त, अ.ता.ए.सो.अकोले,
राष्ट्रीय छात्र सेनेतर्फे मानवंदना स्वीकारताना,सोबत
संस्थेचे पदाधिकारी



मा.आ.मधुकरराव पिचड, परेड निरीक्षण करताना,
सोबत सार्जंट सुवर्णा शिंदे आणि CPL राजश्री खैरनार



नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प, डेहराडून (उत्तरांचल)
यशस्वीरीत्या पूर्ण केल्या बद्दल U/O मनोज देशमुख
मा.विठ्ठलराव चासकर यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना



श्री छत्रपती शिवाजी ट्रेल ट्रेक कोल्हापुर येथे पूर्ण केल्याबद्दल
वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी मा.सुरेशराव कोते यांच्या
हस्ते सत्कार स्वीकारताना CPL निखिल एखंडे



नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प, डेहराडून (उत्तरांचल) यशस्वीरीत्या पूर्ण केल्या बद्दल
CPL मुज्जफर शेख मा.विठ्ठलराव चासकर यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना



राष्ट्रध्वजारोहण प्रसंगी मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे व इतर



सुभेदार मेजर तिवारी यांचा सत्कार करताना
मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे



मा.नामदार दिलीप वळसे पा.परेड निरीक्षण करताना सोबत सार्जन्ट सुवर्णा शिंदे व CPL राजश्री खैरनार



श्री छत्रपती शिवाजी ट्रेल ट्रेक कोल्हापुर येथे पन्हाळगड चढताना मेजर शिंदे, सोबत CPL एखंडे व छात्र सैनिक



एन.आय.सी.कॅम्प ओरीसा येथे नॅशनल इंटिग्रेटशन प्रेझेंटेशन स्पर्धे मध्ये व्दीतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले छात्र सार्जंट सुवर्णा शिंदे व सार्जंट अमोल चव्हाण



राष्ट्रीय स्तरावरील श्री छत्रपती शिवाजी ट्रेल ट्रेक कोल्हापुर येथे यशस्वीरीत्या पुर्ण केल्याबद्दल मेजर शिंदे यांचा सत्कार करताना मा.विठ्ठलराव चासकर व मा.प्राचार्य



सार्जंट सुवर्णा शिंदे नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प,ओरीसा येथे यशस्वीरीत्या पूर्ण केल्या बद्दल मा.विठ्ठलराव चासकर यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना, सोबत मा.प्राचार्य



मा.प्राचार्य व उपप्राचार्य, मा.ले.कर्नल सर्मा, सु.मेजर तिवारी, मे.शिंदे, U/O देशमुख व N.C.C. छात्र



ले.जनरल एम्.सी.भंडारी, डी.जी., N.C.C., दिल्ली यांच्या अ.नगर भेट प्रसंगी मे.शिंदे,व ले.कर्नल सर्मा



राष्ट्रीय स्तरावरील विविध कॅम्प्स व उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल स्नेहसंमेलन प्रसंगी सत्कार करण्यात आलेले N.C.C. अधिकारी व छात्र.



ले.कर्नल सर्मा यांचे महाविद्यालयात स्वागत करताना CPL मयुरी मोढे व CPL विनिता मंडलिक



ले.कर्नल सर्मा यांना सन्मान गार्ड देताना U/O देशमुख व N.C.C. छात्र सु.मेजर तिवारी,मे.शिंदे

# संस्मरणीय भेटी २००५-०६




डॉ.अशोक कोळसकर (कुलगुरु, पुणे विद्यापीठ) व सौ.कोळसकर
आणि डॉ.मु.गो.ताकवले कुलगुरु,कोल्हापुर विद्यापीठ



उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासाठी पाहणी
करताना विद्यापीठ कमिटी सदस्य डॉ.देसाई व इतर.
विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार समोर



सौ.नयना निमकर, संचालक बी.सी.यू.डी.पुणे विद्यापीठ, यांची सदिच्छा भेट



उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासाठी पाहणी करताना
विद्यापीठ समिती वनस्पती शास्त्र विभागात



उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासाठी पाहणी करताना विद्यापीठ
समिती सदस्य डॉ.देसाई व इतर बॉटनिक गार्डन मधून येताना



## शोधांच्या विश्वात



### पानोपानीं


| क्र. | प्रबंधाचे शीर्षक | संशोधक-अभ्यासक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | रणजित देसाई यांच्या साहित्याचा अभ्यास : कथा व कादंबरी | डॉ. भास्कर खांडगे | २०६ |
| २. | बालबोधमेव्याचे बाल साहित्यविषयक कार्य:इ.स.१८७३-१९१० | डॉ. सुनील शिंदे | २०७ |
| ३. | Regional, Agricultural and Industrial Imbalance in Ahmednagar District, (Maharashtra State) | डॉ. मोहनकुमार बारगजे | २०८ |
| ४. | दक्खिनी हिंदी रूबाइयाँ - एक अनुशीलन | डॉ. सौ. अकीला शेख | २०९ |
| ५. | कवि पद्माकर की कविता में बिम्ब - विधान | डॉ. अनिरुद्ध वांगडे | २१० |
| ६. | स्वधर्म : विश्वव्यापी मानवधर्म - एक चिकित्सा | डॉ. विजय बाणकर | २११ |
| ७. | संत ज्ञानेश्वरांच्या संदर्भात संतसाहित्यातील भक्तिसंकल्पना | डॉ. विजय शेडगे | २१२ |
| ८. | Luminescence and Thermoluminescence of $BaMgAl_{10}O_{17}$ :X,Y (rare & non rare earth) | डॉ. अविनाश झांबरे | २१३ |
| ९. | Agro-based Model For Sustainable Development in the Purandhar Tahsil of the Pune District, Maharashtra. | डॉ. विजय भगत | २१४ |
| १०. | Problems and Prospects of Tribal Population in the Ahmednagar District (Maharashtra) | डॉ. शिवाजी खेमनर | २१५ |

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - १

❑ **प्रबंध विषय** **: रणजित देसाई यांच्या साहित्याचा अभ्यास : कथा व कादंबरी**

❑ **संशोधक** : प्रा. डॉ. भास्कर खांडगे, पर्यवेक्षक, कनिष्ठ महाविद्यालय.

❑ **मार्गदर्शक** : डॉ. कन्हैया कुंदप, प्रमुख, मराठी विभाग, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कऱ्हाड, जि. सातारा.

❑ **विद्यापीठ** : पुणे विद्यापीठ

❑ **पदवी जाहीर झाल्याची तारीख :** १७ जानेवारी १९९४

❑ **संशोधन-प्रयोजन** : लोकप्रिय आणि दर्जेदार कथा कादंबरीकार, नाटककार म्हणून रणजित देसाईंचे स्थान मराठी साहित्यात मोलाचे आहे. तथापि त्यांच्या साहित्यावर समीक्षा नव्हती. हे खूप मोठे काम मराठीत सर्वप्रथम करून नवी पायवाट निर्माण करण्याचे कार्य सदर प्रबंधरूपाने केले आहे.

❑ **आशयविषयक** : रणजित देसाई हे मराठी साहित्यातील लोकप्रिय व दर्जेदार कथा कादंबरी होते. *स्वामी* कादंबरीच्या रूपाने मराठीत एक आगळा वेगळा इतिहास लिहिला गेला. *श्रीमान योगी* ही शिवाजी महाराजांच्या जीवनाचा वेध घेणारी चरीत कहाणी मराठीत श्रेष्ठ ठरली. महारथी करणाच्या जीवनावरील *राधेय* जगद्विख्यात चित्रकार राजा रविवर्मा यांच्या जीवनावरील कादंबरी, बेरड जीवनावरील मराठीत पहिली कादंबरी *बारी* , *माझा गांव*, दलित जीवनाचा वेध घेणारी *समिधा* कादंबरी मराठीतील मनुष्य प्राणी विरहित जीवनाचा वेध घेणारी *शकिरा/शेकरा* अशा बारा कादंब-या त्यांनी लिहिल्या. *स्वामी* चे आवृत्त्यांबाबतचे रेकॉर्ड अजूनही मराठी वाङ्मयात मोडले गेले नाही. संगीतमय सामाजिक कथा, स्वातंत्र्यवीरांच्या जीवनाचा अंतिम आलेख चितारणारी कथा, ग्रामीण जीवन, प्रेमकथा इ. प्रकारांनी समृध्द असलेले १२ कथासंग्रह, विविध स्वरूपाची नाटके ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये होत. संगीतमय प्रेमकथा हा वेगळाच प्रकार मराठीत त्यांनी आणला.

❑ **वैशिष्ट्ये -**

१) पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात जवळजवळ हजार पृष्ठांचा असलेला हा एक ऐतिहासिक प्रबंध ठरला आहे.

२) वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वप्रथम **विद्यावाचस्पति** या पदवीने सन्मानित.

३) सदर प्रबंध लवकरच पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे.

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - २

- **प्रबंध-विषय** : बालबोधमेव्याचे बाल साहित्यविषयक कार्य : इ.स. १८७३ - १९१०
- **संशोधक** : प्रा.डॉ. सुनील शिंदे, मराठी विभाग, कनिष्ठ महाविद्यालय
- **मार्गदर्शक** : विख्यात संशोधक, साहित्यीक,लोकसाहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. गंगाधर मोरजे, अहमदनगर
- **विद्यापीठ** : पुणे विद्यापीठ,
- **पदवी जाहीर झाल्याची तारीख** : २३फेब्रुवारी १९९४
- **संशोधन प्रयोजन** : अमेरिकन मराठी मिशन तर्फे १९४२ पासून सुरू झालेला **ज्ञानोदय** या नियतकालिकाची पुरवणी म्हणून **बालबोधमेवा** हे मुलांसाठीचे मासिक इ.स. १८७३ ते १९४५ या कालावधीत प्रसिध्द झाले. विज्ञान, संस्कृती, नीतीमूल्ये, भूगोल विदया, धर्मज्ञान, कथा, काव्य, कोडी इ. घटकांशी संबंधित मुलांना समजू शकेल, रोचक ठरेल आणि मुख्य म्हणजे बोधकारक ठरेल असे साहित्य या मासिकातून प्रसिध्द होत असे. मनोरंजनाबरोबरच बोध व्हावा, हा उद्देश या मासिकाचा होता. **बालबोधमेवा**च्या या दखलपत्र कार्याचे वैशिष्ट्यपूर्ण मूल्यमापन व संशोधन होणे गरजेचे असल्यानेच प्रस्तुत विषयाची निवड केली गेली.
- **आशयविषयक वैशिष्ट्ये** : केशवसुत,बालकवी (त्र्यंबक बापूजी ठोंबरे), रेव्ह. ना. वा. टिळक, लक्ष्मीबाई टिळक, ज्ञानपीठ विजेते कविवर्य कुसुमाग्रज या दिग्गज साहित्यकारांचे लेखन याच मासिकात सुरूवातीस प्रसिध्द झाले आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण मासिकाच्या बालसाहित्यविषयक कार्याचा / योगदानाचा परामर्श प्रबंधात घेतला आहे. या संशोधनाचे मोल उल्लेखिताना कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणाले होते, ''आपले हे अपेक्षित विषयावरील संशोधन मोलाचे आहे व मराठी काव्याच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरेल.'' संशोधकीय, सूक्ष्म व कठीण कामाचा गौरवपूर्ण उल्लेख समीक्षक, साहित्यीक प्रा. म. ना. अदवंत यांनी केला, ''समकालीन नियतकालिकांची वैशिष्ट्ये आणि **बालबोधमेवा** ची वैशिष्ट्ये यांची तौलनिक मांडणी, वेगळेपण आणि श्रेय हे सगळे एकत्र, सुसंगत आणि पध्दतशीरपणे सम्यकपणे प्रथमच सिध्द करणयात आले आहे.'' असाच अभिप्राय समीक्षक, संशोधक प्रा. वसंत दावतर यांनीही व्यक्त केला आहे.

  फिलाडेल्फीया (अमेरिका) येथील संशोधक मॅल्कम नॅझरेथ यांनी स्वत: याच विषयाशी संबंधित त्यांच्या संशोधनासाठी संदर्भ सहकार्य अपेक्षिले, गौरवपूर्ण उल्लेख केला. शिशूगीतांविषयीचा मागोवा संशोधनात घेतल्याने आनंद व्यक्त करणारी भावना विख्यात कवयित्री इंदिरा संत यांनी बेळगांवहून कळविली होती.

  मराठी मुलांच्या मासिकाचे स्वरूप व कार्य, ऐतिहासिक आढावा, समकालीन मुलांचे वाङ्मय विज्ञानविषयक बोधपर साहित्याचा मागोवा हे या संशोधनाचे प्रमुख मुद्दे आहेत.



*आपल्या स्वत:च्या निरीक्षणाचा निष्कर्ष नमूद करून आजच्या ज्ञानात आपल्या संशोधनाने अधिक अशी निश्चित भर कोणती घातली आहे हे ( संशोधकाने ) सांगितले पाहिजे.* – **डॉ. दु. का. संत**

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - ३

❑ प्रबंध-विषय : **Regional, Agricultural and Industrial Imbalance in Ahmednagar District, (Maharashtra State)**

❑ संशोधक : प्रा.डॉ. मोहनकुमार बारगजे, प्रमुख, अर्थशास्त्र विभाग

❑ मार्गदर्शक : प्रो. डॉ. जी.डी. लोढे. प्रमुख,अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर.

❑ विद्यापीठ : पुणे विद्यापीठ, पुणे.

❑ पदवी जाहीर झाल्याची तारीख : १० नोव्हेंबर १९९५

❑ आशयविषयक :

सदर प्रबंधात मी नगर जिल्ह्याचे दोन विभाग केलेले आहेत. त्यात उत्तर व दक्षिण नगरमध्ये अकोले, संगमनेर. पारनेर , कोपरगांव, श्रीरामपूर व राहुरी या तालुक्यांचा तर दक्षिण नगरमध्ये नगर, श्रीगोंदा, कर्जत,जामखेड, नेवासा, शेवगांव या तालुक्यांचा समावेश आहे. या दोन विभागातील " Regional, agricultural and Industrial Imbalance in Ahmednagar District." या संबंधी सविस्तरपणे मांडणी केलेली आहे. त्यात शेती, उद्योग, सामाजिक सुखसोयी, वाहतूक, दळणवळण, वित्तसंस्था यांचे योगदान, शैक्षणिक क्षेत्र, पशुपालन, फुलबाग विकास आणि राजकीय क्षेत्र अशा विविध क्षेत्रांमधील, 'शेती व औद्योगिक असमतोल' स्पष्ट केला आहे.

दक्षिण नगरपेक्षा उत्तर नगर विभागातील तालुक्यांची वरील सर्व क्षेत्रात प्रगती दिसते. ह्या प्रबंधाचे वेगळेपण म्हणजे आजही नगर जिल्ह्यातील राजकारणात उत्तर नगर आघाडीवर आहे.

थोडक्यात, महाराष्ट्रात आकाराने मोठा असणारा, सहकार क्षेत्रात अग्रेसर असणा-या नगर जिल्ह्यातील प्रादेशिक शेती व औद्योगिक असमतोल दूर करावयाचा असेल तर, उपलब्ध श्रमसंपत्ती, नैसर्गिक संपत्ती, भांडवल, राजकीय ताकद या सर्व साधनांचा पुरेपूर वापर करणे आवश्यक आहे असे वाटते.

अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य. अगस्त्य.

## What Gives Man What.

1. *Honesty, a good report,*
2. *Justice, estimation,*
3. *Prudence, respect,*
4. *Courtesy & liberality, affection,*
5. *Temperance, health &*
6. *Fortitude, a quiet mind.*

- Washington



***The notion ... that ... research can contribute variously to the social, cultural & economic development of the country has been ganing ground. - Wilkinson & Bhandarkar.***

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - ९

- **शोध प्रबंध का शीर्षक :** **दक्खिनी हिंदी रूबाइयाँ - एक अनुशीलन**
- **शोधकर्ता** : प्रा. डॉ. अकीला शेख, अध्यक्षा, हिंदी विभाग.
- **शोधनिर्देशक** : डॉ. मुहम्मद आजम, अध्यक्ष, हिंदी विभाग, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर.
- **विश्वविद्यालय** : पुणे विश्वविद्यालय, पुणे.
- **पदवी प्राप्ति की तिथी** : ६ मार्च १९९६
- **आशय** : फारसी साहित्य का सर्वाधिक लोकप्रिय रचना - विधान **रूबाई** है। इसमें चार समवृत्त चरण होते हैं। प्रथम, द्वितीय और चतुर्थ समतुकान्त होते हैं और तृतीय चरण भिन्न तुक में होता है। प्रत्येक चरण का अपना महत्त्व होता है। रूबाई में 'गागर में सागर' भरने की क्षमता होती है। अन्य विधाओं की तुलना में रूबाई कठिन काव्य विधा है। अत: रूबाई रचनाकार कवि कम ही दिखाई देते हैं।

भारत में कुतुबशाही और आदिलशाही शासन काल में दक्खिनी हिंदी साहित्य का सर्वाधिक विकास हुआ। दक्खिनी हिंदी के कवि प्रतिभा संपन्न थे। उन्होने दक्खिनी हिंदी के रूबाई साहित्य के विकास में महत्त्वपूर्ण योगदान दिया है। इनकी रूबाईयों में कहीं प्रेम का अथाह सागर है तो कहीं मय की मस्ती। कहीं ईश की स्तुति है तो कहीं सफल जीवन जीने का संदेश है तो कहीं आचार- व्यवहार की पवित्रता, कहीं तसव्वुफ के सिध्दान्त हैं तो कहीं नीति की बातें। इस प्रकार इनमें जीवन के प्रत्येक क्षेत्र का सूक्ष्म, स्वच्छ, सुंदर, सरल और स्वाभाविक चित्रण हुआ है। इनका भावात्मक स्तर बहुत ऊँचा है। एक उदाहरण -**ऐ यार जहाँ में कुछ न देखा हमने। बे यार जहाँ में कुछ न देखा हमने ।**
**एक जाँ था बसाता सो तुजे दे के चले । ले यार जहाँ में कुछ न देखा हमने । - गुलाम अली आज़ा.**

दक्खिनी हिंदी के रुबाई साहित्य ने आधुनिक हिंदी रूबाई साहित्य के लिए एक ठोस पृष्ठभूमि तैय्यार की थी । अनेक कवियों ने मोलिक रूबाईया लिखी। रूबाई की तुकान्त पद्धति के आधार पर मुक्तक लिखे। कहा जा सकता है की उमर खैंयाम के अनुवाद नींव के पत्थर बने और उनपर मौलिक रूबाईयों, चौपदों और मुक्तकों का भव्य भवन बच्चन, नीरज अज्ञेय आदि ने खडा किया। इनकी रूबाईयो में विषय की विविधता है । इनमें प्रभावात्मकता और मधुर सृष्टि है । ये हिंदी कविता की स्वर्णिम और मधुर सृष्टि है। इस काव्य ने पाठकों को प्रेम, वेदना,विद्रोह आदि की ऐसी हाला (शराब) पिला दी है कि वह मयमस्त हो कर झुमने लगता है, गाते लगता है ।

***कफन बढा तो किसलिए नज़र तू डबडबा गई। सिंगार क्यों सहम गया बहार क्यों लजा गई।***
***न जन्म कुछ, न मृत्यु कुछ , बस इतनी सिर्फ बात हैं। किसी की आँख खुल गई, किसी को नींद आ गई । - नीरज***

दक्खिनी हिंदी और आधुनिक हिंदी के रूबाईकार कवियों ने हिंदी साहित्य को श्री सम्पन्न करने में महत्त्वपूर्ण योगदान किया है । दक्खिनी हिंदी रूबाईयों पर हिंदी साहित्य में शोध की दृष्टि से अब तक समग्र तथा व्यवस्थित रूप से विचार न किए जाने के कारण ही इस शोध विषय की मौलिकता और औचित्य सिध्द होता है ।



***...the concepts or ... the units of theory should be defined with sufficient clarity to enable the reseaech to proceed. - Wilkinson & Bhandarkar.***

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - ९

- **शोध प्रबंध का शीर्षक :** कवि पद्माकर की कविता में बिम्ब - विधान
- **शोधकर्ता** : प्रा. डॉ. अनिरुद्ध वांगडे
- **शोधनिर्देशक** : डॉ. दयानंद शर्मा, भूतपूर्व आचार्य एवं अध्यक्ष, स्नातकोत्तर हिंदी विभाग, कला वाणिज्य तथा विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर
- **विश्वविद्यालय** : पुणे विश्वविद्यालय, पुणे.
- **पदवी प्राप्ति की तिथी :** १२ ऑगस्ट १९९७
- **आशय और प्रयोजन :** बिम्ब एक मूर्त विधान है, वह अनुभूतियों का रागमय संमूर्तन है। अपनी प्रेषणीयता के कारण वह कवि के अमूर्त भावोंको सहृदयतक पहुँचवाकर एक सेतु का काम करता है। वह कवि की आत्मा की पहचान बनता है और युगविशेष का बोध करा देता है। वह एक कविताके प्राणतत्त्व की भाँति नित्य तत्त्व है। कवि अपने जीवन में प्रत्यक्षीकरण की प्रक्रिया से नाना प्रकार की अनुभूतियों को प्राप्त होता हुआ अपने विशिष्ट संस्कार, स्वभाव, मानसिकता बद्धिमत्ता और युगविशेष के व्यक्तिगत बोध के अनुसार ग्रहण करता जाता है। बाद में वही भावानुभूति कल्पना की सहायता से उसकी कविता में ऐसे प्रस्तुत होती है कि जिससे सहृदय तत्काल तादात्म्य की स्थिति को प्राप्त होता हुआ रसास्वादन करता जाता है। जो कोई कवि यह बिम्ब विधायिनी शक्ति रखता है वही अपनी कृति को उच्च स्तर पर पहुँचवाकर प्रतिष्ठित करता है। कवि पद्माकर रीतिकाल के बहुचर्चित कवियों में एक रीतिसिद्ध कवि हैं, जिनके काव्य में स्वच्छंद कवियों का माधुर्य और आचार्य कवियों का आचार्यत्व एकसाथ प्राप्त होता है। आपने अपनी कविता में कवित्व शक्ति का परिचय जहाँ काव्य-शास्त्र के सुत्रों बंद कर भिन्न-भिन्न नायक नायिकांओं के चित्र अंकित करते हुए दिया है, वही नाना देवि-देवताओं के भक्ति परक छंद लिखकर अपने भक्त हृदय की भी झलक दी है। साथ ही रीतिकाल की प्रमुख विशेषता के अनुसरण में अपने आश्रयदाताओं के स्तुतिपाठ भी गाये हैं। *पद्माभरण,जगद्विनोद* इनके लक्षण ग्रंथ है, पर लक्ष्य है शृंगार। *पद्माभरण* का शृंगार-काव्य नाना नायिकाओं का रुपांकन करता है। *जगद्विनोद* पद्माकर के अन्य ग्रंथों में शीर्ष ग्रंथ है। यह पद्माकर की कीर्ति का मान-चिह्न है जिसमे भाँति-भाँति की नायिकाओं के रुप तथा भाव-भंगिमाओं के चित्र अंकित है, जो बहुत ही सुन्दर, आकर्षक, मोहक बन पड़े हैं। *हिम्मत बहादुर बिरुदावली, प्रतापसिंह बिरुदावली* तथा कुछ प्रकीर्णक छंद पद्माकर के प्रशस्ति-काव्य हैं, जो नाद-सौंदर्य की दृष्टि से महत्त्व रखते है। *गंगालहरी, प्रबोधपचासी, कलि पचीसी* आदि रचनाएँ भक्ति-वैराग्य परक है, जिनका एक-एक छंद एक-एक प्रसंग खड़ा कर देता है।

सारांश, पद्माकर की कविता में जो विशिष्ट अभिव्यंजना कौशल्य है उससे बिम्बात्मक सौंदर्य उभरकर आया है। उसमे कवि की गहरी सूझबूझ और सूक्ष्म दृष्टि पायी जाती है। कवि रामधारी सिंह दिनकर का कथन अक्षरश: सत्य है कि ''चित्रकारी की कसौटी अगर कविता की बड़ी कसौटी है तो रीतिकाल पर भी यह लागू होनी चाहिए... चित्रकारी केवल अंग्रेजी के इमेजिस्ट कवियों की थाथी नही है, उसका एक अतुल भण्डार बिहारी और पद्माकर के पास है।'' शायद अपने युग के कवियों में सन्मान्य स्थान प्राप्त करने का कारण पद्माकर का आकर्षक बिम्ब-विधान ही है।

किंतु उनके काव्य के इस पहलू पर स्वतंत्र रुपसे इससे पहले किसी ने प्रकाश नहीं डाला था, जिसकी नितांत आवश्यकता थी। मेरा शोध प्रबंध इस क्षतिपूर्ति का प्रयास मात्र है। यही इसका मूल्य है और यही इसकी उपादेयता भी।

# अगस्त्य

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - ६

❑ **प्रबंध-विषय** : **स्वधर्म : विश्वव्यापी मानवधर्म - एक चिकित्सा**

❑ **संशोधक** : प्रा. डॉ. विजय बाणकर, प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग

❑ **मार्गदर्शक** : डॉ.एस.आर. तळघट्टी, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

❑ **विद्यापीठ** : पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.

❑ **पदवी जाहीर झाल्याची तारीख :** २४ एप्रिल १९९८

❑ **संशोधन-प्रयोजन** : जी सनातन स्वधर्म-साधना वर्णाश्रमांच्या व त्यांनतर भारतात हजारो वर्षे रूढ असलेल्या जातिव्यवस्थेच्या चौकटीतही शक्य होती ती वर्णाश्रमजातिविरहित झालेल्या वर्तमान समाजातही व सदासर्वदा शक्य आहे. अर्थात्, स्वधर्म ही युगधर्मवर्णआश्रमजातलिंगराष्ट्र - निरपेक्ष संकल्पना आहे, असे स्पष्ट करणे, हे या संशोधनामागील प्रयोजन होय.

❑ **मूलगामी मुद्दे व निष्कर्ष :**

सर्वव्यापक धर्मसंकल्पनेचे स्पष्टीकरण; चार वर्णांच्या उत्पत्ती व स्वरूपाबाबतच्या वर्णनांचा साक्षेपी विचार; शरीराचे चार भाग म्हणजे चार वर्ण; मानवी विकासाच्या चार अवस्था म्हणजे चार वर्ण; त्रिगुणयुक्त वर्तन हे प्राकृत तर त्रिगुणातीत आचरण हे सुसंस्कृत मानवाचे लक्षण, आश्रम - संकल्पनेचे उदात्त स्वरूप; वर्णाश्रमोचित आचरण न करणे व देहाभिमान युक्त आचरण म्हणजे भयावह परधर्म; कलियुगातील संतांनी करून दाखविलेले जातिनिष्ठ स्वधर्माचरण, पुरूषप्रधानतेचा अर्थ, पुरुष-मानवांनीही पतिव्रता व्हायचे असते हे विधान व तदनुसार पुरुषार्थप्रणालीचे निरूपण; अखंड स्वस्वरूपानुसंधान म्हणजे भक्ती हा मोक्षोपाय व मोक्षोत्तर भक्ती हा पंचम पुरूषार्थ; आपल्या दहा देहांचे ज्ञान (निरसन) म्हणजेच स्वत: करावयाचा दशपिंडविधी, पिंडातील स्थूलादी ४ देह म्हणजे अनुक्रमे शूद्रादी ४ वर्ण म्हणून चौदेहातीतता म्हणजे चौवर्णातीतता हे संताचरणाचे सूत्र समजून घेण्यासाठीच्या अध्यात्मकृषी, अध्यात्मोदीम इत्यादी संज्ञांचे स्पष्टीकरण, प्राणायामाचे बहिर्निष्ठ (श्वासनिष्ठ) व अंतर्निष्ठ (प्राणनिष्ठ) स्वरूप आणि निरूपणाचे ओघात इतर अनेक मौलिक बाबींचे स्पष्टीकरण पहिल्या ५ प्रकरणात केले आहे.

'स्वधर्म म्हणजे विश्वव्यापी मानवधर्म ' या ६ व्या प्रकरणात 'संस्कृतीचा बहुवादी दृष्टीकोन' विवरिला आहे. जीव हा देवाचा अंश असल्याने सारे एकाच जातीचे ठरतात म्हणून आंतरजातीय विवाह तत्त्वत: अनुचित नव्हे; परमेश्वर स्वधर्म-संस्थापनासाठी अवतरतो; सर्व मानवांची प्रकृती मूलत: समान असल्याने 'विश्वव्यापी मानवधर्म'ही एकच; त्रिगुणातीत झाले की आत्मज्ञान व विश्वदर्शन होते आणि श्रीज्ञानेश्वरादी संतांप्रमाणे विश्वबंधुत्व समजते व आचरिता येते; संकुचित 'सर्व धर्मांचा त्याग करून मला एकट्याला तू शरण ये' हे गीतेतील विधान स्वधर्माचा उपदेश करते म्हणून त्याचे साधार स्पष्टीकरण केले आहे. शेवटच्या सातव्या प्रकरणात सोहं साधना हीच स्वधर्मसाधना असल्याचे दाखविले आहे. शेवटच्या, सातव्या प्रकरणात 'मी जीव' होय; प्रत्येकाने सो ऽ हंभावाने आत्मदेवाची भक्ती करणे हे संतकृत नामस्मरणाचे सर्वयुगधर्म-सारलक्षण आहे,असा या प्रबंधाचा निष्कर्ष आहे .

**जीवनकलेची साधना** या माझ्या गुरूदेवांच्या- श्री हंबीरबाबांच्या-पुस्तकावर आधारित व प्रामुख्याने संतसाहित्याआधारे सदर संशोधन झाले आहे. प्रबंधाची प्रत महाविद्यालयाचे ग्रंथालयात उपलब्ध आहे.



*प्रबंधात नवीन तथ्यांचा आविष्कार असावा, किंवा जुनी तथ्ये अथवा सूक्ष्म सिद्धान्त नवीन स्वतंत्र दृष्टिकोनातून मांडलेले असावेत; त्यात शोधछात्राची सूक्ष्म विवेचन व निर्णयक्षमता प्रकट झाली पाहिजे.* **- डॉ. दु. का. संत.**

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - ७

❑ **प्रबंध-विषय** : **संत ज्ञानेश्वरांच्या संदर्भात संतसाहित्यातील भक्तिसंकल्पना**

❑ **संशोधक** : प्रा. डॉ. विजय शेडगे, व्याख्याता, तत्त्वज्ञान विभाग

❑ **मार्गदर्शक** : डॉ.श्री. ब. ह. शुक्ल, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

❑ **विद्यापीठ** : पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.

❑ **पदवी जाहीर झाल्याची तारीख** : २३ सप्टेंबर २००३

❑ **आशय व निष्कर्ष** :

या प्रबंधामध्ये संतांची भक्तिसंकल्पना (श्री ज्ञानेश्वरांच्या विशेष संदर्भात) संत साहित्याधारे स्पष्ट केली आहे. भागवत धर्मातील भक्तीचे स्वरूप 'सगुणाकडून निर्गुणाकडे' असे आहे. सगुण म्हणजे नुसती मूर्तिपूजा वगैरे नव्हे; तर, सर्व विश्‍व व त्यातील वस्तूजात व प्राणिमात्र होय. निर्गुण म्हणजे या ऐंद्रिय विश्‍वामागे असलेली अतींद्रिय शक्ती, ऊर्जा, सद्‌वस्तू होय.

संतांची भक्ती दोन प्रकारची आहे : १. ज्ञानपूर्व व २. ज्ञानोत्तर. ज्ञानपूर्वक भक्तीत अनेक साधने, तीर्थयात्रा, मूर्तिपूजा, व्रतवैकल्ये, जप-जाप्य इत्यादी येतात. ज्ञानोत्तर भक्ती म्हणजे सर्व जगाच्या पलीकडील ब्रह्माशी एकरूप होणे होय, परमेश्‍वर सर्वव्यापी, विश्‍वव्यापी आहे. प्राणिमात्राची सेवा हीच त्याची पूजा होय व तीच खरी भक्ती होय. भक्ती मोक्षापेक्षा श्रेष्ठ होय. भक्तीला संतांनी पंचम पुरूषार्थ म्हटले आहे. ह्याअर्थीच **भागवत** हा पंचमवेद मानला जातो. केवळ टाळमृदंगादिंनी, तीर्थयात्रांनी, जपमाळांनी, पूजाअर्चांनी, व्रतनियमांनी केलेली भक्ती ही ***साधना*** स्वरूपाची आहे. संतांनी सामान्य जनांना ती सांगितली असली तरी ***साध्य*** भक्ती, पूर्ण भक्ती, परमेश्‍वराशी सामरस्य हाच ह्या भक्तीचा विवेक आहे. अशी भक्ती अंगी मुरली की तो भक्त भगवंताला प्रिय होतो. 'सात्वस्मिन परमप्रेमरूपा' अशी भक्ती आहे. प्रेम अत्युत्कट, निरपेक्ष, अहंभावरहित व जीवमात्रांशी एकरूप होणारी वस्तू आहे. अशा प्रेमाचे स्थान संत-हृदयात आहे. भगवंतही ह्याच भक्ताचा भुकेला आहे.

'सर्वाभूतीं भगवद्‌भाव' असलेल्या भक्तिसंकल्पनेचे (श्री ज्ञानदेवांच्या) पुढील विशेष पाच प्रकरणे असलेल्या या प्रबंधात स्पष्ट केले आहेत. :- वारकऱ्यांच्या विठ्ठलनिष्ठेला, सगुण-साकार भक्तीला निर्गुण-निराकार परब्रह्माच्या अनुभूतीची बैठक देणे सगुण-निर्गुणाचा समन्वय करणे, भक्ती म्हणजे कर्मकांड नसून प्रत्येक प्राणिमात्रात ईश्‍वर पाहणे. संतांनी भक्तीला सामाजिक नीतीचे अधिष्ठान दिले, वेदाला श्रेष्ठ मानले पण वैदिक धर्मातील कर्मठपणा व संकुचितपणा मोडून काढला आणि स्त्री-शूद्रांना भक्ती करण्याचा अधिकार असल्याचे प्रतिपादिले. कीर्तनभक्तीच्या माध्यमातून सर्व समाजाला एकत्र केले व **भागवत** धर्माला बळकटी दिली.



*संशोधकाने नेहमी सत्याकडे जाण्याची तयारी ठेवावयास हवी. याचा अर्थच हा की विषयनिरीक्षणात अचूकता व विषय निरूपणात मर्मज्ञता यांचे मिश्रण संशोधकाच्या वृत्तीत व्हावयास हवे. - डॉ. पु.ल. भांडारकर*

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - ८

❑ **प्रबंध-विषय** : **Luminescence and Thermoluminescence of $BaMgAl_{10}O_{17}$ :X,Y (rare & non rare earth)**

❑ **संशोधक** : प्रा.डॉ. अविनाश झांबरे, व्याख्याता पदार्थविज्ञान विभाग.

❑ **मार्गदर्शक** : प्रा.टी.आर. जोशी, ॲप्लाईड फीजिक्स, फॅकल्टी ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड इंजिनिअरींग, बडोदा.

❑ **विद्यापीठ** : महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा.

❑ **पदवी जाहीर झाल्याची तारीख** : २३ जानेवारी २००४

❑ **आशय, निष्कर्ष व महत्त्व :**

प्रस्तुत संशोधन दोन भागात केले आहे.

१. सदर मटेरियल हे ट्युबलाईट Tri Colour Phosphor (Cathod rav Tube) इ. ठिकाणी वापरता येऊ शकेल. साधारणतः Ca-Halophosphate and $LapO_4$ हे मटेरिअल वापरले जाते पण वरील मटेरिअल खूप महाग आहे आणि ते तयार करण्याची पद्धतही खूप अवघड आहे. मटेरिअल महाग असण्याचे कारण असे की त्यामध्ये rare-earth (Lanthanide Elements) वापरावे लागते म्हणून जर बेस मटेरिअल स्वस्त घेतले तर त्याची किंमत कमी होऊ शकते. $BaMgAl_{10}O_{17}$:X,Y (Aluminate) हे फॉस्फर स्वस्त आहेत आणि कुठेही उपलब्ध होऊ शकतात. तसेच त्यापासून मिळणारे रिझल्ट्स इतर मटेरिअल सारखेच आहेत.

२. हेच मटेरिअल आपणास High Accident $\gamma$ ray Radiation Dosimetry म्हणून सुद्धा वापरता येतात. ज्या ठिकाणी $\gamma$ —रेडीएशनचा वापर केला जातो उदा. Bhabha Atomic Research Centre, Mumbai या ठिकाणी संबंधित व्यक्तीवर किती डोस ॲबसॉर्ब झालेला आहे ते शोधता येते आणि मग त्यावर योग्य उपचार करता येतात.

या विषयावर १४ राष्ट्रीय व २ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग घेऊन सदर प्रबंध-विषयाशी निगडित असे १५ शोध-निबंध सादर केले आहे. त्यापैकी ९ शोध - निबंध प्रकाशित झाले आहेत.

सदर प्रबंधाची एक प्रत महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध आहे.

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - ९

- ❑ प्रबंध-विषय : Agro-based Model For Sustainable Development in the Purandhar Tahsil of the Pune District, Maharashtra.
- ❑ संशोधक : प्रा.डॉ. विजय भगत, व्याख्याता, भूगोल विभाग.
- ❑ मार्गदर्शक : प्रा.डॉ. प्रविण सप्तर्षी, प्रमुख, भूगोल विभाग, स.प. महाविद्यालय, पुणे.
- ❑ विद्यापीठ : पुणे विद्यापीठ, पुणे.
- ❑ **पदवी जाहीर झाल्याची तारीख : ९ जून २००५**

**❑ आशय, निष्कर्ष व वैशिष्ट्ये :**

पुरंधर तालुका हा महाराष्ट्रातील तीव्र दुष्काळांनी ग्रासलेल्यापैकी एक. उपलब्ध पाण्यापेक्षा वापर वाढत गेल्याने या सर्वच प्रदेशात भूजलाची पातळी खालावत चाललेली आहे. पावसाचा लहरीपना व भूजल या एकमेव संरक्षण देणाऱ्या पाणी साधनांच्या दुरवस्थेमुळे या प्रदेशातील शेती-आधारित अर्थव्यवस्था हलाखीची बनली आहे. येथील लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी **पाणी** या कळीच्या मुद्द्याला धरून नियोजन करावयास हवे. प्रस्तुत अभ्यासात पाण्याच्या उपलब्धीप्रमाणे जमीन, हवामान, मानवी साधनसंपत्ती इ. घटक विचारात घेऊन तालुक्याच्या विकासासाठी बाहेरील मदतीपेक्षा स्थानिक क्षमतांचा वापर करण्यावर भर देण्यात आला. गांव हे विकासाचे एकक मानून तेथील पाण्याची उपलब्धी, जमीन आणि मानवी साधनसंपत्ती यांचा अभ्यास करून त्यांचे पीकरचनेच्या दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे. एखाद्या पिकाचे एकरी किती टन उत्पादन मिळाले यापेक्षा त्या पिकापासून शेतकऱ्याला किती रुपये मिळाले, हे विकासाचे नियोजन करीत असतांना विचारात घ्यावे लागते. म्हणून बाजारातील किंमतींच्या आधारावर किंमत-नफा विश्लेषण, बाजार जोखीम, किंमतीचे पूर्वानुमाण इ. विश्लेषणे करून सध्याच्या पीकरचनेत सुधारणा सांगण्याचा प्रयत्न केला आहे. नवीन पीक रचना सूचविताना पाण्याच्या बचतीबरोबरच शेतकऱ्याला मिळणारा नफा वाढला पाहिजे, या तत्त्वाकडे विशेष लक्ष देण्यात आले.

विकासाचे नियोजन करताना उपलब्ध माहिती आणि विश्लेषणाचे तंत्र व पद्धत प्रमाण असणे आवश्यक असते. गांवपातळीवर उपलब्ध व वापरले जाणारे पाणी ही मूलभूत स्वरूपाची माहिती आवश्यक असल्याने ती उपलब्ध करण्यासाठी 'थॉर्न्थ वेट' यांनी सांगितलेल्या *पाणी ताळेबंद तंत्राचा वापर करून* जमिनीच्या आकारावर आधारित पाणी मोजण्याची पद्धत या अभ्यासात सर्वप्रथम वापरली आहे. भूजल पातळीतील चढउतार व खोली यांचा विचार करून 'भूजल उपयोगिता वर्गीकरण' करून विविध गावांची भूजलस्थिती ठरविण्यात आली. मानवी साधनसंपत्तीचे विश्लेषण करतांना लोकांच्या वाट्याला येणाऱ्या जमिनीबरोबरच प्रतिएकक शेतजमिनीसाठी मानवी श्रमाची उपलब्धी विचारात घेण्याचा दृष्टिकोन या अभ्यासात नव्याने स्वीकारण्यात आला. विविध पिकांच्या किंमत विश्लेषणात किंमत बाजाराचा निकाल मानून त्याच्या आधारावर बाजार जोखीम व पूर्वानुमाने मांडण्याच्या पद्धतीचा या अभ्यासात विशेष वापर करण्यात आला. त्याचबरोबर 'किंमत-नफा विश्लेषण' करून शेतकऱ्याला मिळणाऱ्या नफ्याचे विश्लेषण करण्यात आले.

*.... अपूर्ण. कृपया पुढील पानावर पहा .*



*Such redefinitions or clarifications (of the concepts accepted as simple & obvious) may in turn lead to the discovery of new hypotheses. - Wilkinson & Bhandarkar.*

## विद्यावाचस्पति (पीएच्.डी.) - १०

- **प्रबंध-विषय** : **Problems and Prospects of Tribal Population in the Ahmednagar District (Maharashtra)**
- **संशोधक** : प्रा.डॉ. शिवाजी खेमनर, व्याख्याता, भूगोल विभाग.
- **मार्गदर्शक** : प्रा.डॉ. प्रविण सप्तर्षी, प्रमुख, भूगोल विभाग, स.प. महाविद्यालय, पुणे.
- **विद्यापीठ** : पुणे विद्यापीठ, पुणे.
- **पदवी जाहीर झाल्याची तारीख :** १० जून २००५
- **संशोधनपर मूल्य/वैशिष्ट्ये/निष्कर्ष :**

सदर संशोधनासाठी ट्रायबल पॉप्युलेशन विचारात घेतली आहे. पूर्ण लोकसंख्येचा अभ्यास करण्यापेक्षा अहमदनगर जिल्ह्यातील ट्रायबल पॉप्युलेशन विचाराम घेऊन पुढीलप्रमाणे अभ्यास करण्यात आला आहे.-

१. तहसील प्रमाणे लोकसंख्या विचारात घेऊन त्याची वैशिष्ट्ये तपासण्यात आली.
२. अकोला, संगमनेर, कोपरगांव तालुक्यांमध्ये ६७.१७ % ट्रायबल पॉप्युलेशन असल्याचे आढळून आले.
३. खेडेगावांप्रमाणे सांख्यिकीय सामग्री अभ्यासण्यात आली.
४. शैक्षणिक समस्येचा विचार करत असताना, लहान वयोगटातील (एज ग्रुप ०३ ते १६) मुले शाळेत न जाण्याचे प्रमाण (तुलनात्मक लोकसंख्येचा विचार करता) जास्त आढळले .
५. सामाजिक-आर्थिक समस्यांचा अभ्यास करतांना जमीन व पर्यावरणीय घटकांचा विचार करण्यात आला.
६. मुलाखत पद्धती, Rapid Rural Appraisal अशा नावीन्यपूर्ण पद्धतींचा वापर करण्यात आला.
७. 'अर्भक मर्त्यता' तुलनेने जास्त आढळून आली.
८. आरोग्य समस्येचा, शासकीय योजनांचा अभ्यास करण्यात आला.

*.... मागील पान क्र. २१४ वरून.*

पीकरचनेतील शेतकऱ्याला नफा मिळवून देणाऱ्या पिकांखालील क्षेत्राच्या आधारावर गावाच्या विकासाचा स्तर निश्चित करून त्याच्याशी त्याच गावातील पाणी ताळेबंदाचा संबंध जोडून गावांचे वर्गीकरण करण्यात आले. त्या गावांच्या वर्गानुसार सहयोगी घटकांचा विचार करून तयार करण्यात आलेला 'पीक आराखडा' शेतकऱ्यांना सांगून त्यांच्या सूचना विचारात घेऊन पुन्हा पीक रचनेत सुधारणा करून शेतकऱ्यांचा स्वीकार तपासण्याचा दृष्टिकोन या अभ्यासात समाविष्ट करण्यात आला.

भौगोलिक माहिती प्रणाली (GIS), विविध संगणकीय व संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर विश्लेषणांसाठी करण्यात आला. या अभ्यासात वापरण्यात आलेल्या काही पद्धती, तंत्र व निष्कर्ष शोधनिबंधांच्या स्वरूपात नामांकित संस्थांनी प्रकाशित केलेल्या 'संशोधन पत्रिकां'मध्ये प्रसिद्ध झालेले आहे. या अभ्यासाचा उपयोग पुरंधर तालुक्याच्या विकासाबरोबरच दुष्काळी प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या उन्नतीसाठी होईल; या अपेक्षेसह संशोधनाच्या निमित्ताने केलेल्या या प्रबंध लेखनाचा हाच हेतू समर्पक वाटतो.